# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र. ०२० [illegible]
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.


जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/२०२१/ 5166 दिनांक : 18 NOV 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग

विषय - शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीताच्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रियेबाबत

संदर्भ – १) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले पत्र क्र.F.No-14-56/2021(Review of SIF)/4996-98, दि.१६.११.२०२१

२) संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/मान्यता/पीसीआय २०२१/१०८९ दि.१७/११/२०२१

३) संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/न.प्र.त/२०२१/१०९१ दि १७/११/२०२१

फार्मसी कौसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रियेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेनुसार विद्यमान संस्थाना त्यांचे पोर्टलवर दिनांक ०१-१२-२०२१ ते दि. १५-१२-२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यास सूचित केले आहे. फार्मसी कौसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी ज्या अर्जासाठी राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे, अशा संस्थाना राज्य शासनाचे ना - हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव या कार्यालयात दि. २५-११-२०२१ पर्यंत जमा करण्यास तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे. वरिल पत्राचे अवलोकन करता, खालील अर्जासांठी राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र अनिवार्य केलेले आहे.

- नविन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे [Introduction of B.Pharmacy New Course ]
- संस्थेच्या / ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in Name of Institute / Trust]
- संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution]
- संस्था बंद करणे [Closure of Institution ]

पूणे विभागातील विद्यमान पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांपैकी ज्या संस्था वरील अर्ज फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचेकडे करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२-०२-२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरुन दि. २५-११-२०२१ पर्यंत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा. सदर प्रस्तावासोबत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या सर्व दस्तवेजासोबत खालील दस्तावेज सुध्दा सादर करण्यात यावेत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

**नोंदणी शुल्क धनाकर्ष Joint Director, Technical Education Regional Office, Pune या नावाने योग्य त्या शुल्कासह सादर करण्यात यावा.**

| अ.क्र | अर्ज | दस्तावेज |
|---|---|---|
| १ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे [Introduction of B.Pharmacy New Course ] | ▪ नोंदणी शुल्क भरल्याची पावती<br>▪ विद्यापीठाचे ना-हरकत<br>▪ संस्थेचा ठराव<br>▪ पीसीआय ने निर्धारीत केलेले अन्य सर्व दस्तावेज |

| अ.क्र | अर्ज | दस्तावेज |
|---|---|---|
| २ | संस्थेच्या / ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in Name of Institution / Trust] | ▪ नोंदणी शुल्क भरल्याची पावती<br>▪ विद्यापीठाचे ना-हरकत<br>▪ संस्थेचा ठराव<br>▪ धर्मदाय आयुक्त कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र (ट्रस्टच्या नावातील बदलासाठी<br>▪ संस्थेच्या / ट्रस्टच्या जुन्या नावाबाबत काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास तथा भविष्यात उद्‌भवल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी नवीन ट्रस्ट घेणार या आशयाचे रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र<br>▪ पीसीआय ने निर्धारीत केलेले अन्य सर्व दस्तावेज |
| ३ | संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution] | ▪ नोंदणी शुल्क भरल्याची पावती<br>▪ विद्यापीठाचे ना-हरकत<br>▪ संस्थेचा ठराव<br>▪ पीसीआय ने निर्धारीत केलेले अन्य सर्व दस्तावेज |
| ४ | संस्था बंद करणे [Closure of Institution ] | ▪ नोंदणी शुल्क भरल्याची पावती<br>▪ विद्यापीठाचे ना-हरकत<br>▪ संस्थेचा ठराव<br>▪ संस्थेविरुध्द काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास व भविष्यात उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील या आशयाचे रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र<br>▪ शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे जबाबदारी घेण्याबाबतचे रु १०० /- च्या स्टॅप पेपरवर हमिपत्र<br>▪ संस्था सुरु करताना शासकीय जमीन घेतली असल्यास ती परत करण्याबाबतचे रु १००/- स्टॅप पेपरवर हमीपत्र अन्यथा शासकीय जमिन घेतली नसल्याचे प्रतिज्ञापत्र<br>▪ शासन अथवा अन्य शासकीय संस्थांकडून निधी अथवा इतर सवलती घेतल्या असल्यास त्याबाबतची माहिती<br>▪ पीसीआय ने निर्धारीत केलेले अन्य सर्व दस्तावेज |

सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी. तसेच वरिल अर्ज कोणत्याही परिस्थीती अपूर्ण, त्रुटीयुक्त असल्यास सदर अर्ज या कार्यालयाकडून दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे